# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६१ वी बैठक दिनांक १८ ऑगस्ट २००९

**ठराव**

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६१ वी बैठक दि. १८ ऑगस्ट २००९ रोजी जलसंपदा विभागाचे परिषद सभागृह,मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | विसस व उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | उपाध्यक्ष |
| ४. | मा. इं. व्यं. वि. गायकवाड | ... | सचिव (जसं) व सदस्य |
| ५. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | इं. ह. य. कोळवले | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती. एम. व्ही. कोकणे, सहसचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. श. मा. भुते, उपसचिव | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. सु. ल. पाटील | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | श्री. अनिल शिरुडे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |

सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**“मान्य”**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६१ वी बैठक दिनांक १८ ऑगस्ट २००९

### ठराव

ठराव क्र. ६०/१

"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ६० व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. ६१/०२

"ठराव करण्यांत येतो की, मौजे मोढवे, ता. बारामती, जि.पुणे येथील पाझर तलाव मुर्टी मोढवे करिता संपादित गट क्र. ३७१ मधील २ आर जागा भविष्यात महामंडळास लागणार नसल्याने, सदर अतिरिक्त जमिनीची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.६१/०३

"ठराव करण्यांत येतो की, मौजे साटपेवाडी, ता. वाळवा जि. सांगली येथे कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेअंतर्गत बांधलेल्या बंधा-यालगत स्मशानभूमीसाठी ग्रामपंचायत मौजे साटपेवाडी यांनी मागणी केलेली २ आर जागा विनामोबदला देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६१/०४

"ठराव करण्यांत येतो की, केंद्र / राज्य शासनाच्या विविध स्त्रोतातून / कार्यक्रमाद्वारे मंजूरी मिळालेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नगरपालिका / ग्रामपंचायत यांचेकडून विहीर/पाण्याची टाकी इत्यादी साठी मागणी केलेल्या २ आर क्षेत्रापर्यंतच्या जमीनी (जमीनीची शासकीय किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर) संबंधित नगरपालिका / ग्रामपंचायत यांना देण्यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्याचे अधिकार मा. मंत्री जलसंपदा (कृखोपाम) तथा अध्यक्ष महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे मान्यतेने कार्यकारी संचालक यांना प्रदान करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ६१/५

"ठराव करण्यात येतो की, ग्रामपंचायत कोळकी, ता. फलटण, जि. सातारा यांनी स्मशानभूमीसाठी मागणी केलेली ३ आर जागा प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळावी. तसेच स्मशानभूमीसाठी ये-जा करण्यासाठी शासकीय वसाहतीतून रस्ता देता येणार नाही या अटींवर जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६१ वी बैठक दिनांक १८ ऑगस्ट २००९

**ठराव क्र. ६१/६**

**''ठराव करण्यात येतो की, प्रगतीपथावर असलेल्या तसेच यापुढील स्वबळावरील निविदेतील देयके अदा करण्याबाबतची अट (Bills & Payments) खालीलप्रमाणे शिथिल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

"The payments will be made to the contractor, if funds are available after one year of commencement of work."

**ठराव क्र. ६१/७**

**"सिंचनभवन, पुणे येथील महामंडळांतर्गत कार्यालयांसाठी एकत्रितपणे बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली प्रचलित दर करारातील तरतुदीनुसार बसविण" हा विषय नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्यामुळे याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.**

**मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय**

**ठराव क्र. ६१/८**

**"ठराव करण्यात येतो की, मौजे वाटखळ, ता.जुन्नर जि.पुणे येथील ग्रमस्थांची मागणी आणि या गावालगतच्या पाण्यामुळे विषारी सर्प, रोगांचा प्रादुर्भाव तसेच या गावातील घरांना पडलेल्या भेगा या वस्तुस्थितीनुसार पिंपळगांव जोगे धरणाच्या जलमग्न क्षेत्राबाहेरील मौजे वाटखळ ता.जुन्नर जि.पुणे या गावाचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ६१/९**

**"ठराव करण्यांत येतो की, या वर्षीची टंचाई / दुष्काळी परिस्थिती विचारात घेता चा-याचा प्रश्न व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शक्य असलेल्या उपसा सिंचन योजना कार्यान्वित/अंशतः कार्यान्वितीकरणासाठी लागणा-या विद्युत देयकांचा खर्चाच्या निधीची मागणी टंचाई अंतर्गत तातडीने शासनास करावी व या निधीमधून योजना कार्यान्वित कराव्यात."**

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे